Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# नेतृत्वाचे घटक - एक अध्ययन

**प्रा. डॉ. अंकुश अंबादासराव चव्हाण**
विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक
मत्स्योदरी महाविद्यालय तिर्थपुरी
ता. घनसावंगी जि. जालना
मो. नं. ९५५२३८७२६६

नेतृत्वाच्या अध्ययनात पुढाऱ्यांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास हा महत्वपूर्ण ठरला आहे. कारण प्रत्येकाच्या व्यक्तीमत्वाची जडण घडण भिन्न असते. तसेच राजकीय घटकांवर व्यक्तीमत्वाचा प्रभाव पडतो हे उघड सत्य आहे, तसेच नेतृत्वाच्या भिन्न व्यक्तीमत्वाचे कारण त्याचे सामाजिक स्त्रोत भिन्न असतात. तसेच नेतृत्व ही सतत चालणारी प्रक्रिया आहे, परंतु प्रत्यक्षात राजकारणाची चर्चा करतांना केवळ घटनांच्या अभ्यासावर भर दिला जातो. वॉल्टर लिपमनने असे म्हटले आहे की, मनुष्याच्या व्यक्तीमत्वाचा संदर्भ जोडून राजकारणासंबंधी बोलणे ही एक घोडचुक होय. कारण राजकीय घटनांची चर्चाकरतांना त्या व्यक्ती साक्षेप असतात. एक किंवा अनेक व्यक्तीच्या क्रिया प्रतिक्रयेतुन घटना उद्भवतात म्हणून घटनाचे सुत्रधार असलेल्या राजनेत्याच्या व्यक्तीमत्वाचे महत्व लक्षात घेणे आवश्यक आहे.नेतृत्व ही एक व्यापक तथा गतिमान स्वरुपाची संकल्पना आहे. त्याची सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे अवघड आहे. प्राचीन भारतीय आदर्श गुणधिष्ठित नेतृत्वाची एक परंपरा असून अनेक विचारवंतानी चिरंतन सत्याचा अनुभव घेण्यासाठी तथा मानव समाजात उच्च मुल्ये निर्माण करण्यासाठी राजकारणाला साधन म्हणून मानले आहे. प्लेटोच्या रिपब्लीक मधील तत्वज्ञ शासकाची Philosopher ruler ही संकल्पना प्राचीन भारतीय नेतृत्व संकल्पनेशी मिळती जुळती आहे. नेतृत्वाचा अभ्यास भिन्न दृष्टीकोनातुन केला जातो त्यात गुणदृष्टीकोन गट गटदृष्टीकोन परिस्थिती दृष्टीकोन व शक्ती प्रक्रिया दृष्टीकोन महत्वपूर्ण आहेत.

**अ. नेतृत्वाच्या व्यक्तीमत्वाचे जैविक समाजिक घटक :—**

नेतृत्वाच्या अध्ययनात पुढाऱ्यांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास हा महत्वपूर्ण ठरला आहे. कारण प्रत्येकाच्या व्यक्तीमत्वाची जडण घडण भिन्न असते. तसेच राजकीय घटकांवर व्यक्तीमत्वाचा प्रभाव पडतो हे उघड सत्य आहे, तसेच नेतृत्वाच्या भिन्न व्यक्तीमत्वाचे कारण त्याचे सामाजिक स्त्रोत भिन्न असतात. तसेच नेतृत्व ही सतत चालणारी प्रक्रिया आहे, परंतु प्रत्यक्षात राजकारणाची चर्चा करतांना केवळ घटनांच्या अभ्यासावर भर दिला जातो. वॉल्टर लिपमनने असे म्हटले आहे की, मनुष्याच्या व्यक्तीमत्वाचा संदर्भ जोडून राजकारणासंबंधी बोलणे ही एक घोडचुक होय. कारण राजकीय घटनांची चर्चाकरतांना त्या व्यक्ती साक्षेप असतात. एक किंवा अनेक व्यक्तीच्या क्रिया प्रतिक्रयेतुन घटना उद्भवतात म्हणून घटनाचे सुत्रधार असलेल्या राजनेत्याच्या व्यक्तीमत्वाचे महत्व लक्षात घेणे आवश्यक आहे.

प्रत्येक व्यक्तीमत्वाची जडण घडण वेगवेगळ्या पध्दतीने झालेली असते त्यामुळे प्रत्येकाची वागणुक विशिष्ट परिस्थितीने प्रभावित झालेली असते. अनेक घटनाच्या बाबतीत पुढाऱ्याची प्रतिक्रीया जशी भिन्न असते तसेच सारख्या घटनांच्या संदर्भात पुढाऱ्याच्या

प्रतिक्रीया भिन्न स्वरुपाच्या असतात उदा. एखादी पुढारी आक्रमकपणे टिका करतो तर एखादा आदरपुर्वक सौम्य व अलंकारीक भाषेत दोष दाखवितो. एखादी व्यक्ती जेव्हा नेता म्हणून पुढे येते तेंव्हा तिची पुढाकार घेण्याची शैली तिच्या नेतृत्व साकार होण्याच्या विशेष परिस्थितीत दिसून येते की ज्या परिस्थितीत तो पुढारी म्हणून कार्य करते. तसेच तिच्या व्यक्तीमत्वाच्या गुणावरच नव्हे तर तिच्या अनुयायांच्या गुण वैशिष्टांवर देखील तिची नेतृत्व शैली अवलंबून असते.

इंग्रजीमधील Personality हा शब्द लॅटीन भाषेतील Person या शब्दातुन विकसीत झाला असून त्याचा अर्थ नकली चेहरा असा होतो. जसे नाटकामध्ये नकली चेहरा लावून अभिनेते आपला वास्तविक चेहरा लपवित होते. त्यामुळे व्यक्तीमत्व म्हणजे इतरांना दृष्टीगोचर होणरे बाह्यरुप असा अर्थ झाला वस्तुत: तसा अर्थ आपणास अभिप्रेत नाही. एखादी व्यक्ती कशी दिसते यापेक्षा ती कशी आहे हेच आम्हाला अभिप्रेत आहे. कारण एखादी व्यक्ती जसी दिसते त्यापेक्षा भिन्न असू शकते.

**ऑल पोर्ट** — एखाद्या व्यक्तीचे दिसणे व व्यक्तीमत्व यात फरक असू शकतो. यावरुन असा प्रश्न उपस्थित होते की, व्यक्तीमत्व म्हणजे काय ? किम्बल यंगच्या शब्दात व्यक्तीमत्व हे व्यक्तीच्या सवयी मनोवृत्ती लक्षणे आणि विचार यांचा एक असा योग आहे की, बाह्यरुपात विशिष्ट तथा सामान्य कार्य व स्थितीच्या रुपात दिसतो तर आंतरीक रुपात आत्मचेतना स्वत:ची धारणा विचारमुल्ये उद्देश व त्याचे प्रेरक कार्य आणि स्थितीशी संबंधीत असतात. यावरुन दोन बाजू दिसतात. एक व्यक्तीची स्थिती व कार्य मिळून बनणारी व दुसरी म्हणजे आंतरीक जिच्यामध्ये व्यक्तीचे विचार मनोवृत्ती संबंधी चेतना इ. मानसिक तत्वाचा समोवश होतो या दोन्ही बाजु परस्पर भिन्न नसून परस्परावलंबी आहेत.

**ब. नेतृत्वाचे व्यक्तीमत्व घडवणारे घटक :—**

कोणत्याही समाजातील व काळातील पुढारी आपल्या अनुयायामध्ये विशेष गुणांनीयुक्त असतात. हे विशेष गुण म्हणजे त्याच्या व्यक्तीमत्वाचे अभिन्न घटक होय. एक म्हणजे जैविक समाजीक दुसरा म्हणजे सांस्कृतीक दोन्हीवर शिक्षण तथा परिस्थितीचा प्रभाव पडतो.

१. **वक्तृत्व व वाक्चातुर्य** :— नेत्यांना आपले विचार प्रभावीपणे लोकांच्या अंतर्मनात उतरविण्यासाठी अमोध वक्तृत्व हा व्यक्तीमत्वाचा एक महत्वाचा घटक आहे. वक्तृत्व ही उपजत देणगी (God Gift) मानली जाते. तसेच विशेष अभ्यासातुन तिची प्राप्ती करणे शक्य आहे. वक्तृत्वाच्या अनेक प्रभावी शैली आहेत. आपल्या विचारांची सुसंगत मांडणी करणे अनेक प्रकारची मनोवेधक उदाहरणे देवून विषय सोप्या भाषेत मांडणे, भाषणाला उपमा, उत्प्रेक्षा इ. अलंकाराचा साज चढविणे. श्रोत्यांना भावनात्मक आवाहन करणे चेहऱ्यावरील भाव तसेच अभिनयाव्दारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणे अशा अनेक पध्दतीचा नेत्याव्दारे अवलंक केला जातो.

२. **आत्मविश्वास (Self Confidence)**:— पुढाऱ्याच्या व्यक्तीमत्वासाठी आत्मविश्वास नितांत आवश्यक आहे. यामुळे तो समुहाचे नेतृत्व करु शकतो. त्यासाठी मनाची दृढता आवश्यक आहे. आत्मविश्वासाशिवाय अनेक अडचणीच्या परिस्थितीत तो अनुयायीचे मार्गदर्शन करण्यास असफल होतो. बोलीग्रेथ तथा काहुलेच्या मते अनुयायीपेक्षा पुढाऱ्यामध्ये आत्मविश्वास अधिक असतो. आत्मविश्वासामुळे बिकट परिस्थितीत कसा चमत्कार होते याचे उदाहरण म्हणजे चर्चिलचे नेतृत्व होय.

३. **उत्साह, प्रफुल्लता, साहस व गतिशिलता** :— या गुणाव्दारे पुढाऱ्याचे मानसिक व्यक्तीमत्व प्रकट होते. याशिवाय कल्पना शक्ती (Imagination) प्रेरणा तथा निश्चय (Drive and determinations) मानसीक लवचिकता (Mental Flexibility) मनोवैज्ञानिकाच्या मते या मनाच्या अवस्था आहेत. एखादी व्यक्ती एखाद्या प्रसंगी अधिक उत्साही प्रफुल्ल असते. साहसी व प्रेरणादायक असते. दुसऱ्या प्रसंगी याउलट असू शकते परंतु नेत्याच्या बाबतीत वरील प्रकारच्या अवस्था जितक्या अधीक प्रमाणात असतात. तीनक्या अधिक प्रमाणात त्यांचे व्यक्तीमत्व प्रभावी ठरते व विश्वास निर्माण होतो. अनुयायांना गती प्राप्त होते कार्य करण्याची चिकाटी निर्माण होते तर प्रफुल्लतेमुळे अनुयायांना आपले नेते लक्षात येते. साहस व निर्भयपणामुळे धोका पत्करण्याची तयारी होते. कल्पनाशक्तीमुळे नविन प्रयोग करण्याच्या योजना मनात येतात यासर्व गुणसमुहामुळे नेत्याचे व्यक्तीमत्व अधिक गतीशील होवून अनुयायांना प्रेरक बनते.

४. **चारित्र्य** (Character) :— समाजाच्या नैतिक तथा सामाजीक रुढी / प्रथांचे पालन पुढा—यांनी करावे अशी समाजाची अपेक्षा असते, म्हणून नेत्याचे चारित्र्य उत्तम असावे, अनुयायी नेत्याचे अनुकरण करतात. श्रेष्ठ प्रतीचे चारित्र्य असणाऱ्या नेत्यांना समाजात समाज मान्यता प्राप्त होते याउलट सामाजीक तथा नैतिक मुल्यांची उपेक्षा करणाऱ्याला नेतृत्वापसून वंचित व्हावे लागते. मनोवैज्ञानिकदृष्ट्या चारित्र्याचे दृढ चरित्र व दुर्बल चारित्र्य असे दोन प्रकार आहेत. नेत्यामध्ये दृढ चारित्र्याची आवश्यकता असते. एखाद्या परिस्थितीत अथवा वातावरणात दुर्बल चारित्र्याची व्यक्ती पुढारी बनली तर अंशीक काळापर्यंत ती नेतृत्व करु शकत नाही.

५. **शारीरिक स्वास्थ तथा शक्ती** :— बेलग्रेथच्यामते सामान्य व्यक्तीपेक्षा नेत्याला अधिक परिश्रम करावे लागतात म्हणून त्याचे स्वास्थ उत्तम असणे आवश्यक आहे. तसेच त्याच्या मते शारीरिक बलसुध्दा भरपूर हवे सभा, सम्मेलने बैठकी, दिर्घकाळ चालणारे प्रवास, आंदोलने यात पुढाऱ्याला फार धावपळ करावी लागते. खाणे — पिणे, विश्रांती, निद्रा या नितांत आवश्यक गरजा त्याला नियमितपणे प्राप्त होवू शकत नाहीत. या सर्व विपरीत परिस्थितीवर मात करण्यासाठी त्याचे शारीरिक स्वास्थ उत्तम हवे व शक्ती देखील भरपूर हवी. यादृष्टीने भारतात व बाहेरील देशामध्ये भुतकालीन व वर्तमानकालीन पुढाऱ्यांच्या व्यक्तीमत्वार दृष्टी टाकल्यास त्या गोष्टीचा निश्चित प्रयत्य येतो. निरोगी प्रकृती व उत्तम स्वास्थाबद्दल श्री मोरारजी देसाई, नरेंद्र मोदी यांची विशेष प्रसिध्दी आहे.

६. **बुध्दी तथा प्रतिभा** :— सामान्य व्यक्तीपेक्षा पुढाऱ्यामध्ये बुध्दीची मात्रा अधिक असते. कॅटल मॅनचे निष्कर्ष १९५९ तथा स्टाईसच्या १९५३ अध्ययनाचा निष्कर्ष असाच आहे. बुध्दीचे अनेक पैलू आहेत त्यामध्ये विज्ञान, कला, साहित्य, वाणिज्य, यांत्रिकी, सामाजीक, विज्ञान अशा निरनिराळ्या क्षेत्रांना उपयुक्त बुध्दी संशोधन रचनात्मक कार्याची जाणीव असणारी तसेच समाजाचे मार्गदर्शन करण्यास दुरदृष्टी असणारी अशा विविध प्रकारांना प्रतिभा म्हटल्या जाते. पुढाऱ्यांना सर्व विषयाचे आकलन प्राप्त करुन त्यामधील समस्याचे निराकरण करणारी प्रतिभा पाहिजे ती अनुवंशीक तथा उपजत असू शकते. ती शिक्षणातुन विकसीत होते. ही प्रक्रिया बहुमुखी असावी लागते. कारण प्रश्नाचे स्वरुप संकिर्ण व परस्परावर अवलंबून असते. त्यात आर्थिक, सामाजीक, क्षत्रिय, सैनिक, जातीय, वंशीक, स्थानिक, प्रादेशीक, राष्ट्रीय,

आंतरराष्ट्रीय असे भिन्न प्रश्न असतात. त्यासाठी उच्च कोटीची बुध्दीमत्ता मौलिकता, अंतर्दृष्टी आवश्यक आहे.

**७. संघटन कुशलता आणि कार्यकारी क्षमता**

या गुणांमुळेच नेते अव्दितीय ठरतात मात्र त्यासाठी सामजीक जबाबदारीची जाण (Social Responsiveness) या सामान्य हितसंबंध तथा उद्दिष्टाच्या लोकापासून तर भिन्न भिन्न हितसंबंधाच्या मानव समुहांना एकत्र आणण्यासाठी नेत्यामध्ये विलक्षण मानसीक लवचिकता आवश्यक असते. संघटनेसाठी अनुयायांना हा नेता आपला आहे असे वाटणे व त्यासाठी अनुयायामध्ये भावनात्मकता ऐक्य वाढविणे ही महत्वाची गरज असते. जगातील सर्व महानेत्यापासून तर साधारण पुढा—यापर्यंत संघटन व कुशलता तथा संचलन क्षमता आढळून येते.

**८. उद्देश तथा दिशेच ज्ञान :—**

**९. प्रभूत्वाची लालसा व लक्षण :—**

**१०. आत्मसंयम तथा आत्म नियंत्रण:—**

**११. सामाजीकता तथा मानवीयता :—**

अशा प्रकारे नेत्याचे व्यक्तीमत्व घडवणारे घटक सांगता येतील मात्र नेतृत्व काही नव्यानेच निर्माण झाले असे नाही. ते प्राचीन काळापासून भिन्न देशात विकसीत झाले मात्र या विसाच्या शतकाच्या उत्तरार्धात त्यात झपाट्याने बदल झाल्याचे दिसून येते नेतृत्वाचे स्वरुप प्रायोजीकतचे असून नेतृत्वाचे उद्दिष्ट नैतिक आहे त्यात मानवी हिताची निश्चिती आहे. इतकेच नव्हे तर नेतृत्व हे स्वयंसिध्द असल्यामुळे नेतृत्वाचे नेतृत्व हेच स्वत: उद्दिष्ट आढळते. नेतृत्वाने परिवर्तनाची दिशा निश्चित करावी परिवर्तन उन्नतीच्या दिशेने होणे आवश्यक आहे. त्यात मुल्यांची घसरण नसावी व त्यासाठी नेतृत्वाचे प्रशिक्षण हा देखील एक मार्ग आहे. प्रशिक्षण केवळ तात्वीक नसून व्यवहार्य आहे भारतामध्ये नेतृत्वाच्या प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय विद्यापिठाची स्थापना करण्यात यावी या महत्वाच्या विषयाची आता यापुढे उपेक्षा नको.

**संदर्भ ग्रंथ**

१. कंगले र. प. कौटिल्य अर्थशास्त्र
२. Lord Lioyd of Dolobram. Leadership in Democracy oxford University press London 1939 P. 70
३. जनार्धन ठाकुर, हे नेते जनतेचे, उत्कर्ष प्रकाशन पुणे १९७८
४. Kimball Young Hand Book of social Psychology Leadership and followers P. 251
५. David L Sills (Ed) International Encyclopedia of the social sciences Vol-3 ( New York/ London: The Macmilian Co and the Free Press – 1972 P. 97
६. Fred I Greenstein Personality and polities micro politics P. 82